२०

# "विद्यार्थ्यांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेच्या सज्जतेची गरज."

कु. स्मिता चिं पाटील,
पी. एच.डी.स्कॉलर,
शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. सुधा पिंगळे,
सहा. प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**सारांश**

आजचा बालक हा उद्याचा नागरिक आहे. बालकांचा सर्वांगिण विकास हे ध्येय पूर्ण करण्यासाठी प्रत्येक शाळा मनापासून कार्यरत असते. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात, सामाजिक, मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्यांचे समाधान कसे करावे? हे विद्यार्थ्यांना कळत नाही. अशा वेळी शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या सामाजिक, मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता आणि शालेय वातावरण महत्त्वपूर्ण ठरते. विद्यार्थ्यांना येणाऱ्या सामाजिक, मानशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता असणे गरजेची असून प्रत्येक शाळा त्यासाठी प्रयत्नशील असते. कौशल्य कमतरता, निष्क्रियता, अभ्यासाचा कंटाळा करणे, परिक्षेचा ताण, अध्ययन अक्षमता या सारख्या शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता असणे आवश्यक आहे. वर्तन समस्या, सवयी संबंधित समस्या , भावनिक समस्या या मानसशास्त्रीय समस्या तसेच बालशोषन एड्सग्रस्त मुले, शस्त्रासह मुले, बालमजूरी, अंमली पदार्थाचे सेवन करणे, बालक हरचणे. बालकांचे आरोग्य व पोषण, आर्थिक दृष्टया मागास मुले, मागासर्वीय बालकांचे प्रश्न, लिंगभेद, या सारख्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या सामाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा सामाजिक, मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता महत्तपूर्ण आहे. म्हणून " विद्यार्थ्यांचा समाजिक , मानशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेच्या सज्जतेच्या गरजेबाबत या लेखात चर्चा केली आहे."

**मुख्य शब्द :**

शाळेची सज्जता, शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता, मानसशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता आणि सामाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता.

**प्रस्ताावना**

शिक्षणाचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. प्राचीन काळी शिष्य शिक्षणासाठी गुरूकुलात जावून शिक्षण घेत असत. सद्य स्थितीत विद्यार्थी शाळेत जावून शिक्षण घेतात. शाळा ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात मोलाची भूमिका बजावते. बालकांचा सर्वांगिण विकास करणे. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी



Vol: 7th , Issue : II , English-Marathi, Quarterly: 1st Sep. 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

प्रत्येक शाळा मनापासून कार्यरत असते . जीवनात शालेय विद्यार्थ्यांना कधी कधी निसर्गतः अथवा माणसाने निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे काही समस्यांना सामोरे जावे लागते . हया समस्या वेगवेगळया स्वरूपात विद्यार्थ्यांच्या समोर येतात . शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या असतात .

हया समस्यांना कसे हाताळावे हे त्यांना समजत नाही . अशा परिस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या मानसशास्त्रीय समस्या, आणि सामाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता आणि शालेय वातावरण महत्तपूर्ण भूमिका बजावते . त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या, मानसशास्त्रीत समस्या आणि सामाजिक समस्या यांचा अभ्यास करताना शालेय वातावरणा संदर्भात शाळेची सज्जता अभ्यासणे महत्त्वपूर्ण ठरते . म्हणून संशोधिकेने विद्यार्थ्यांच्या समाजिक, मानशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जतेची गरज याबाबत पुढे चर्चा केली आहे .

बाल्यावस्था शिक्षण (Early Childhood Education) (2018) : सज्जता ही संज्ञा पुढे काय होणार आहे हयाच्या तयारीचे वर्णन करण्यासाठी वापरली जाते .

अमेरिका राष्ट्रीय शिक्षण ध्येय पॅनलची शालेय सज्जता ची व्याख्या ३ प्रमुख क्षेत्राचा समावेश करतेः

१) बालकांची सज्जता शाळेसाठी

२) शाळेची सज्जता बालकांसाठी

३) मुलांच्या शाळेसाठी सज्जतेच्या यशस्वीतेसाठी कुटुंब आणि समुदायाचा आधार आणि सेवा यांचे योगदान

बाल्यावस्था शिक्षण (Early Childhood Education) (2018) : वैयक्तिक बालकाची शाळेची सज्जता हे मोठया प्रमाणावर तो किंवा ती ज्या पर्यावरणामध्ये राहतात आणि वाढतात याने निर्धारीत होते . अमेरिकेच्या बालक कल्याण लीगने युनायटेड स्टेटसाठी असे व्हिजन वर्णित केले . ज्यामध्ये प्रत्येक बालक निरोगी आणि सुरक्षित असून त्याच्या किंवा तिच्या पूर्ण क्षमतेपर्यंत विकसित होईल . सर्व मुलांचे पाच जागतिक गरजांचे वर्णन केले होते . प्रथमत: बालकाला खूप प्राथमिक पोषण, आर्थिक सुरक्षा, पर्याप्त कपडे आणि निवारा योग्य शिक्षण आणि प्राथमिक आणि प्रतिबंधक, शारीरिक आणि मानसिक आरोग्य सेवांची गरज असते . द्वितीय, मुलांना त्यांच्या कुटुंबामध्ये समुदायामध्ये आणि समवयस्कांमध्ये मजबूत पालनपोषणाची गरज असते . तृतीय, मुलांना त्यांचे गुण आणि कौशल्य विकसित करणाऱ्या आणि त्यांच्या समुदायात योगदान करणाऱ्या संधीची गरज असते अक्षमता असणारी मुले यांना पूर्व परीक्षण आणि हस्तक्षेपाची गरज असते . ज्यामुळे पुढे होणारे गंभीर समस्या टळू शकतील . चौथे, मुलांना जखम, शौषण, उपेक्षा यापासून त्याचप्रमाणे हिंसा आणि भेदभाव होणापासून संरक्षणाची गरज असते . पाच, मुलांना निरोगी असण्याची प्राथमिक गरज आहे .

जेव्हा आपण त्यांचे संरक्षण करण्यास असमर्थ ठरतो. त्यावेळी मुलांना, त्यांना होणाऱ्या हानीचे प्रभाव कमी करण्यासाठी आपली मदत हवी असते. जी आपण त्यांना भावनिक आणि मानसिक आधार देवून त्याचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य काळजी घेवून आणि काही वेळा न्यायिक सरावाचे पुर्नस्थापन करून भरपाई करण्याची गरज असते या गरजा भागविण्यासाठी एकत्रित बहुसमावेशक दृष्टीकोन याची गरज असते म्हणजे बालके ही कुटुंबाच्या समुदायाच्या आणि राष्ट्राच्या स्तरावर एक प्राथमिकता असते.

डॉकेट, सु: पेरी, बॉब (मार्च २००९) यांनी शाळेसाठी सज्जता : संबंध तयार करणे याचा अभ्यास केला आहे. सज्जता म्हणजे वेगवेगळया लोकांसाठी वेगवेगळी बाब आहे, तरीही जवळजवळ नेहमी असा एक समज आहे की, वैयक्तिक मुलांच्या गुणवैशिष्ट्यांचे, मुल्याकंनाच्या काही प्रमाणित अपेक्षांचा सेट किंवा अपेक्षित वैशिष्ट्यांचा समावेश शाळेच्या सज्जतेमध्ये असतो. त्यांनी सज्जतेच्या तीन पैलूंचे अन्वेषण केले. मुलांच्या तयारी बाबतचे विचार, मुलांसाठी शाळेची तयारी आणि कुटुंब आणि समुदायाचा आधार जे सज्जतेचे समर्थन करते. हयापैकी प्रत्येक पैलूच्या महत्त्वाची ओळख ही त्या निष्कर्षाला आधार देते की, फक्त मुलांच्या वैयक्तिक वैशिष्ट्यांवर लक्ष दिल्यावर जास्तीत जास्त सज्जतेची एक अरूंद आणि मर्यादित संकल्पना मिळेल आणि ती मुलांच्या हिताच्या विरूद्ध कार्य करणारे असू शकेल.

बाल शोषणावर एक अध्ययन : इडिया २००७, चे आयोजन महिला व बाल विकास मंत्रालय (जीओई-भारत सरकार) तर्फे करण्यात आले ज्यायोगे असे स्पष्ट झाले की, वेगवेगळया प्रकारच्या अत्याचारांमध्ये, लहान मुलांस, म्हणजे ५ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांना अत्याचार व शोषण यांस बळी पडण्याचा फार जास्त धोका असतो. या अत्याचारांमध्ये शारीरिक, लैंगिक तसेच मानसिक अत्याचारांचा समावेश होतो.

गोकटे पी. एस्. (२००८-२००९) यांनी समावेशित शिक्षणासाठी शाळांची सज्जता: शाळेच्या प्रकाराच्या आधारावर तुलना यावर अभ्यास केला. संशोधनाचे मुख्य निष्कर्ष असे की, सर्व तीन प्रकारच्या शाळा उदा. एस्.एस्.सी, आय.सी.एस्.ई.सी.बी.एस्.ई. समावेशित शिक्षणासंबंधी विकसित होत होत्या आणि या शाळा प्रकारात समावेशित शिक्षणासंबंधी समान सज्जता होती.

हॉली डे मॅथ्यू आर.: सिमेटा, ॲडीयाना : कटशॉ, ख्रिस्टीनो ए.: यादेन डेव्हीड: मार्क्स रोनॉल्ड डब्ल्यू २०१४ यांनी गरीबीत असलेल्या मुलांमध्ये शाळेच्या सज्जतेचे संरक्षण करणारे घटक यावर अभ्यास केला. कुटुंबाचा आर्थिक स्तर आणि त्यांच्या मुलांची अध्ययन निष्पत्ती हयामध्ये घनिष्ट संबंध आहे. उदा. जास्त संपन्न मुलांच्या तुलनेत गरीबीमध्ये राहणारी मुले वाचन आणि गणिताच संपादन याचे मापन केल्यावर कमी गुण मिळवितात आणि बालवाडीपासूनच ही उपलब्धी मधील अंतर दिसून येते. त्या अभ्यासामध्ये ॲरिझोनामधील दारिद्रय रेषेवर आणि

खाली असणाऱ्या (N=230) मुलांच्या न्यादर्शामध्ये शाळेची सज्जता संरक्षण घटकांशी संबंधित आहे . असे त्यांनी ओळखले शाळेची सज्जतेचे मूल्यमापन, आरोग्य स्तर, बालकांची काळजी घेण्याचा काळ, घराची भाषा, पालकांची गुंतवणूक आणि पालकांचे शिक्षण यामधील संबंधाचे परिक्षण त्यांनी बहुस्तरीय रेषीय प्रतिगमनचा वापर करून दैनदिन बालकांची काळजी घेण्याच्या वेळात वाढ आणि उत्तम आरोग्य याचा संबंध गणित , साहित्य मध्ये उच्च निष्णात आणि अध्ययनासाठी दृष्टीकोन, याच्याशी संबंधित होता . आणि गरीबीत असलेल्या मुलांसाठी स्थिती स्थापक घटक ठरू शकून . जो उपलब्धी अंतर कमी करण्यासाठी योगदान देवू शकेल असे त्यांना आढळून आले .

केळकर . ग . (२०१२) यांच्या मते , 'व्यक्ति तितक्या प्रकृती' या न्यायाने मुलांमधील समस्या विविध प्रमाणात आढळून येतात . शिकण्यासंबंधीच्या समस्यामध्ये (लर्निन डिसॅबिलिटीज) भाषा न कळणे, किंवा बोलताना अडखळणे, अडचणी येणे, अशा प्रकारच्या समस्या दिसून येतात . तर काही मुलांमध्ये समज कमी असल्यामुळे, मतिमंदता, गतिमंदता, अशा प्रकारचे दोष आढळतात . काही मुलांमध्ये अवाजवी चिंता करण्याची प्रवृत्ती असते . तर त्यांच्या बरोबर उलट टोक म्हणजे बेफिकिरपणा हा काही मुलांमध्ये असतो . काही मुले हळवी असतात . तर काही मुले 'लहरी' असतात . या सर्व समस्यांचा अभ्यास करताना असे दिसून आले की, सध्याच्या पिढीत मुलांच्या वर्तन विषयक समस्या या जास्त प्रमाणात आहेत .

केळकर, ग . (२०१२) यांच्या मते, अमेरिकन सायकिॲट्रिक असोसिएशनच्या 'डायग्नॉस्टिक् ॲन्ड स्टॅटिस्टिकल मॅन्युएल ऑफ मेंटल डिसऑर्डस्' या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीत मुलांमधील तीन प्रकारच्या मुख्य वर्तनविषयक समस्या सांगितलेल्या आहेत . त्यापुढील प्रमाणे- १) अटेन्शन्-डेफिसिट/हायपर् ॲक्टिव्हिटी डिस्ऑर्डर (ए . डी . एच् . डी) यामध्ये अत्यंत कमी वेळ लक्ष एकाग्र रहाणे . भावनाशता अतिचंचलता, २) ऑपोझिशनल् डिफायन्ट डिस्ऑर्डर (ओ . डी . डी . ) ३) कंडक्ट डिस्ऑर्डर (सी . डी) पालकांना काही कारणांमुळे मुलांना पुरेसा वेळ देता आला नाही . त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले आणि यातूनच मुलांमध्ये काही समस्या झाल्या . जसे की मुलांमध्ये नीतीमूल्ये कमी होत गेली . मोठ्यांचा आदर न वाटणे, खोटे बोलणे, राग करणे अशा अनेक गोष्टी सहज घडू लागल्या अनेक प्रकारच्या समस्या मुलांमध्ये बळावू लागल्या .

गायकवाड अ . (२०१२) यांच्या मते, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षणात वांद्रे ते दहिसर मधील एका वर्गातील ७२ प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी लिहिलेल्या प्रातिनिधिक स्वरूपात असलेल्या बालकांच्या काही समान समस्या पुढीलप्रमाणे- शाळेत उशीरा येणे, मधल्या सुट्टीत पळून जाणे, गृहपाठ-स्वाध्याय पूर्ण न करणे, शाळेत न येता शाळेच्या वेळात बाहेर जाणे, लेखन साहित्य, पाठ्यपुस्तके, वह्या न आणणे, शाळेचा गणवेश व्यवस्थित नसणे, बूट, रिबीन, काही विद्यार्थी सतत गैरहजर असतात . शाळेत अनियमित

असणे वर्गात बेशिस्तपणाची वागणूक असते . बेजबाबदार वर्तन करणे, गोंधळ घालून शिकविताना अडथळा निर्माण करणे . अपशब्दांचा सर्रास वापर करणे, चौऱ्या करणे . दुसऱ्याचा डबा खाणे, घरात शिक्षणाचा अभाव असणे . समजत नसूनही माहिती न विचारणे, शाळेच्या किवा शिक्षकांच्या बाबतीत गैरसमज असणे, शिक्षणपद्धती अभ्यास परीक्षा इत्यादीविषयी नावड, नाखुषी असणे, वाचनाची आवड नसणे, सहशालेय कार्यक्रमात भाग न घेणे . संवाद नसणे, काही विद्यार्थी स्वत:मध्येच स्वमग्न असतात . काही तासानांतर अस्थिर, चूळबूळ सुरू होते . कोणत्याही कारणास्तव वर्गाबाहेर जाण्यास उत्सुक असणे अध्यापनाच्या वेळी लक्ष बाहेर केंद्रीत असते पौंगडावस्थेतील येणाऱ्या मुलामुलींना एकमेकांबद्दल वाटणारे आकर्षण . एस् एम् एस् किंवा कोडवर्ड भाषेचा वापर करणे, चित्रपट, टी व्ही सारख्या बाहय माध्यमांचे अनुकरण करून हातात, गळयात चालू फॅशनप्रणाणे वस्तू घालणे किंवा केशरचना करणे मित्रमंडळीकडून ऐकलेल्या गोष्टीला वाव देणे, परीक्षेची, गणिताची विशेष भीती . 'नापास' या शब्दाचीही भीती वाटणे . तपासलेल्या उत्तरपत्रिका दिल्यानंतर त्यांत खाडाखोड, खोटे बोलणे, गुण वाढविण्याकडेच कल असणे .

प्रत्येक बालकाच्या समस्या वेगवेगळया असतात . शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या, मानशास्त्रीय समस्या, आणि सामाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, त्यामुळे शाळेची सज्जता गरजेची आहे .

१) शाळेची सज्जता

प्रस्तुत संशोधनात शाळेची सज्जता म्हणजे शालेय स्तरावरच शिक्षण घेत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या, मानसशास्त्रीय समस्या आणि सामाजिक समस्या त्वरीत आणि प्रभावीपणे हाताळण्यासाठीची शाळेच्या भागधारकांची (प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक ) तयारी होय .

अ) शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता

प्रस्तुत संशोधानात शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता' म्हणजे शालेय स्तरावरच शिक्षण घेत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या अध्ययन समस्या या शैक्षणिक समस्या त्वरीत आणि प्रभावीपणे हाताळण्यासाठीची शाळेच्या भागधारकांची (प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक) तयारी होय .

i) अध्ययन समस्या म्हणजे यामध्ये कोशल्य कमतरता , निष्क्रियता, अभ्यासाचा कंटाळा करणे व अभ्यास करणे टाळणे, परिक्षेचा ताण यांचा समावेश होतो .

ब) मानशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता

प्रस्तुत संशोधनात मानशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता म्हणजे शालेय स्तरावरच शिक्षण घेत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या वर्तन समस्या, सवयी संबंधित समस्या आणि भावनिक समस्या या मानसशास्त्रीय समस्या त्वरीत आणि प्रभावीपणे हाताळण्यासाठी शाळेच्या भागधारकांची (प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी, पालक ) तयारी होय .

i) वर्तन समस्या म्हणजे यामध्ये स्वयंप्रेरित निष्क्रीय प्रतिक्रियाशील, गुंडगिरी, लाजाळू/एकांतप्रिय, चोरी करणे, अति चळवळया, चावणे आणि दंगा करणे यांचा समावेश होतो.

ii) सवयी संबंधित समस्या म्हणजे नखे चावणे, केस खेचणे, डोके आपटणे, स्वत:ला मारणे किंवा चावणे, मुलातील विचित्र सवयी–दोष, खोटे बोलणे, बेशिस्ती यांचा समावेश होतो.

iii) भावनिक समस्या म्हणजे, भावनिक अस्वस्थ आणि भावनिक अक्षमता यांचा समावेश होतो.

भावनिक अस्वस्थ म्हणजे चिंता व दु:ख आणि भीती यांचा समावेश होतो.

भावनिक अक्षमता म्हणजे राग व आक्रमकता, नैराश्य यांचा समावेश होतो.

क) सामाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता

प्रस्तुत संशोधनात सामाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता म्हणजे शालेय स्तरावरच शिक्षण घेत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या बाल शोषण, एड्सग्रस्त मुले, अंमली पदार्थाचे सेवन करणे, बालक हरवणे व बालकाचे अपहरण, बालकांचे आरोग्य व पोषण, आर्थिक दृष्टया मगास बालके मागासवर्गीय बालकांचे प्रश्न, लिंग भेद, शस्त्रासह मुले आणि बालमजुरी या विद्यार्थ्यांना येणाऱ्या सामाजिक समस्या त्वरीत आणि प्रभावपिणे हाताळण्यासाठीची शाळेच्या भागधारकांची (प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक) तयारी होय.

विद्यार्थ्यांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेच्या सज्जतेची गरज:–

१) विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी :

आजचा बालक हा उद्याचा नागरिक आहे. त्याचा सर्वांगिण विकास होणे आवश्यक आहे. जो देशाच्या विकाश आणि उन्नतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावेल. अशा या उद्याच्या नागरिकांच्या निर्माणासाठी तसेच त्याला येणाऱ्या विविध समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता गरजेची आहे.

शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये व्यक्ति भेद आढळून येतो. जगात व्यक्ति तितक्या प्रकृती असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना आपल्या वैयक्तिक जीवनात वेगवेगळया समस्यांना सामोरे जावे लागते. हया समस्या शैक्षणिक, सामाजिक मानसशास्त्रीय असू शकतात. जर शाळा या समस्या हाताळण्यात सज्ज नसेल तर विद्यार्थ्यांच्या समस्या हाताळण्यात शाळा असमर्थ ठरू शकते तसेच ती विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास बाधक ठरू शकते. म्हणून विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक, सामाजिक आणि मानसशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता गरजेची आहे.

विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या जसे कौशल्य कमरता, अभ्यासाचा कंटाळा करणे, परीक्षेचा ताण, अध्ययन अक्षमता या समस्या जर दूर करण्यास शाळा सज्ज असेल तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व फुलते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी शाळेची सज्जता गरजेची आहे.

विद्यार्थ्यांची कौशल्य कमतरता जाणून घेण्यासाठी त्याचे निदानात्मक चाचणी द्वारे मूल्यांकन करून निदान झाल्यानंतर त्यावर उपचारात्मक अध्यापन देणे. शैक्षणिक साहित्याचा वापर करून कौशल्य कमतरता कमी

करण्याचा प्रयत्न करणे विद्यार्थ्यांचे संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी त्याला त्याच्या मनातील विचार व्यक्त करण्यास संधी देणे, अधिक तासिका घेवून शिकविणे, विविध उपक्रमांचे आयोजन करणे . मनोरंजनात्मक पद्धतीने शिकविणे .

शैक्षणिक खेळ घेणे, मनोरंजनात्मक पुस्तकांचा वापर करणे, कवायती घेणे, विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यासा–प्रती सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यास, विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा ताण दूर करण्यासाठी ताण व्यवस्थापन कार्यशाळा, योग्य अभ्यासाची सवय विकसित करण्यास, वेळ व्यवस्थापन कसे करावे हे शिकविण्यासाठी शाळेची सज्जता (म्हणजेच शाळेच्या भागधारकांची तयारी) गरजेची आहे .

विद्यार्थ्यांची वाचन अक्षमता दूर करण्यासाठी संगणक कक्षाचा वापर करून संगणकाद्वारे दृक श्राव्य माध्यमातून वाचन करण्याची संधी देवून विद्यार्थ्यांची वाचन अक्षमता ही समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता पाहिजे .

लेखन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य विकसित करण्याकडे विशेष लक्ष देणे वर्गात विद्यार्थ्यांला फळयावरील मुद्दे लिहून घेण्यास अधिक वेळ देणे . गणन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांकडून विविध गणिती क्रियांचा (शाब्दीक अशाब्दीक) सराव करून घेणे, शिक्षण, दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणांचा समावेश करून गणिती अक्षमता दूर करण्याचा प्रयत्न शाळेत केला जातो . अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेती सज्जता गरजेची आहे . तसेच विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता म्हणजेच शाळेच्या भागधारकांची तयारी ही अति गरजेची आहे . ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होईल .

२) विद्यार्थ्यांच्या समस्या हाताळण्यासाठी :– विद्यार्थ्याच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मानसशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शालेय सज्जता गरजेची आहे .

३) विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी :– विद्यार्थ्यांना येणाऱ्या सामाजिक समस्या उदा . बालशोषण विद्यार्थ्यांचे शाळेतून हरवणे व अपहरण, यासारख्या समस्यां पासून विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी सज्जता गरजेची आहे .

४) प्रतिबंधात्मक उपाय :– विद्यार्थ्यांना येणाऱ्या समाजिक समस्या उदा . बालशोषण, विद्यार्थ्यांचे शाळेतून हरवणे व अपहरण, अंमली पदार्थांचे सेवन करणे यासारख्या समस्यांचा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विद्यार्थ्यांना अनोळखी माणसांकडून खाऊ, पेय इ . घेण्यास मज्जाव करणे विद्यार्थ्यांचा सुरक्षिततेसाठी सुरक्षा रक्षक नेमणे . विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्याचा प्रयत्न करणे शाळेत शस्त्र (धारदार वस्तू/बंदूक–चाकू) आपण्यास मज्जाव करणे, विद्यार्थ्यांना कायम स्वरूपी ओळखपत्राची सक्ती करणे यासारखी शाळेची सज्जता विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्या हाताळण्यासाठी दूर करण्यासाठी शाळेच्या भागधारकांची (प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक) तयारी म्हणजेच शाळेची सज्जता गरजेची आहे .

५) जागृकता निर्माण करण्यासाठी :

अ) शिक्षकांमध्ये जागृकता निर्माण करण्यासाठी

ब) विद्यार्थ्यांमध्ये जागृकता निर्माण करण्यासाठी

क) पालकांमध्ये जागृकता निर्माण करण्यासाठी

शाळेतील प्रशासक , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक या प्रत्येक भागधारकांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, समाजिक आणि मानशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी व त्या दूर करण्यासाठी जागृकता निर्माण करण्यासाठी शालेय सज्जता गरजेची आहे .

६) विद्यार्थ्यांमधील दोष /समस्या दूर करण्यासाठी :

विद्यार्थ्यांमध्ये असणारे दोष /समस्या उदा . कौशल्य कमतरता, निष्क्रीयता, अभ्यासाचा कंटाळा करणे किंवा अभ्यास करणे टाळणे, परीक्षेचा ताण, अध्ययन अक्षमता या समस्या दूर करण्यासाठी शाळेची सज्जता गरजेची आहे .

विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समस्या स्वयंप्रेरीत, निष्क्रीय, प्रतिक्रियाशील, गुंडगिरी, लाजाळू, चोरी करणे, अति चळवळया, चावणे, दंगा करणे या सारख्या समस्या, दोष दूर करण्यासाठी विद्यार्थ्याला सकारात्मक अभिप्राय देणे, चांगले वर्तन यावर कार्यशाळा आयोजित करणे, आई-वडीलांना मार्गदर्शन करणे इ . प्रकारे विद्यार्थ्यांमधील समस्या किंवा दोष दूर करण्यासाठी शाळेच्या भागधारकांद्वारे (प्रशासक, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी) शाळेची सज्जता असणे गरजेचे आहे .

७) विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी विकसित करण्यासाठी :

शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या सवयी असतात . उदा . नखे चावणे, केस खेचणे, विद्यार्थ्यांतील विचित्र सवयी/दोष, खोटे बोलणे, बेशिस्ती या दूर करण्यासाठी चांगले वर्तन यावर कार्यशाळा आयोजित करून चांगले-वाईट नीती-अनीती कृत्ये यातील फरक समजावून सांगून, समुपदेशन इ . द्वारे विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी विकसित करण्यासाठी, (शाळेच्या भागधारकांद्वारे) शाळेची सज्जता असणे गरजेचे आहे .

८) विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांचे मूल्यांकन करण्यासाठी व उपचारात्मक अध्यापन करण्यासाठी :

विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांचे मूल्यांकन करून त्या दूर करण्यासाठी त्या समस्यांवर उपचारात्मक अध्यापन करण्यासाठी शाळेची सज्जता आवश्यक आहे .

९) कौशल्य विकास करण्यासाठी :

विद्यार्थ्यांमधील संप्रेषण, श्रवण, आणि चित्रकला कौशल्य इ . कौशल्य विकसित विकसित करण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या (अध्ययन अक्षमता) दूर करण्यासाठी शाळेतील सज्जता गरजेची आहे .

१०) मार्गदर्शन व समुपदेशन :

अ) पालकांचे मार्गदर्शन व समुपदेशन :

विद्यार्थ्यांना येणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक आणि मानसशास्त्रीय समस्या पाहून पालक हतबल होतात. आपला पाल्य हया समस्येतून कसा बाहेर पडेल? हा त्यांच्या समोर प्रश्न असतो. अशा वेळी विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, मानसशास्त्रीय समस्या हाताळून भागधारकांची (शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी) सज्जता गरजेची आहे.

ब) शिक्षकांचे मार्गदर्शन व समुपदेशन :

शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसशास्त्रीय आणि सामाजिक समस्या हाताळून दूर करण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यासाठी सज्जता गरजेची आहे.

क) विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व समुपदेशन :

शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसशास्त्रीय आणि सामाजिक समस्या विद्यार्थी स्वत: सोडवू शकत नाहीत. त्यामुळे त्यासाठी योग्य मार्गदर्शक व समुपदेशकाकडून मार्गदर्शनाची व समुपदेशनाची आवश्यकता असते यासाठी शाळेची सज्जता गरजेची आहे.

बालकांना अनेक समस्यांना व प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. हे प्रश्न अथवा समस्या निसर्गत:असू शकतात किंवा मानवनिर्मित असू शकतात. विद्यार्थी ६ तास शाळेत असतात. या वेळात त्यांचा शाळा मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संपर्कात येतात. हया व्यक्तिच्या जर मुलांच्या समस्या निदर्शनास आल्या त्या शालेय पातळीवर दूर करणे महत्त्वपूर्ण ठरते. हयामध्ये शालेय वातावरणात हया समस्या दूर करण्यात शाळेची सज्जता महत्त्वपूर्ण ठरते.

आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो समाजाचा एक घटक आहे. त्यामुळे शैक्षणिक, मानसशास्त्रीय आणि सामाजिक समस्या मुक्त समाज निर्माण करायचा असेल तर विद्यार्थ्यांच्या समस्या शालेय वातावरणा संदर्भात शाळेची सज्जता याद्वारे दूर करून देशाचा व समाजाचा सुशिक्षित, निरोगी, सर्वागिण विकास झालेला नागरिक व सक्षम सदस्य बनण्यास मदत होईल. ज्यायोगे सक्षम समाज निर्मीतीस मदत होईल. या सर्वाचा परिणाम म्हणून विद्यार्थ्याच्या शैक्षणिक, मानसशास्त्रीय आणि सामाजिक समस्या दूर झाल्यामुळे त्याचा फायदा मानवाच्या शैक्षणिक, मानसशास्त्रीय आणि सामाजिक विकासासाठी, संपूर्ण मानवजातीला फायदा होईल.

असा प्रकारे विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि मानसशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता (प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक या शाळेच्या भागधारकांद्वारे) गरजेची आहे.

संदर्भ सूची

१. Early Childhood Education. What is School Readiness? Retrieved from https://sites.google.com/a/acsd.k12.ca.us/early-childhood-education/home/what-is-school-readiness

२. Pamela, C. (2008) . School Readiness. *PEDIATRICS* Vol. 121 No. 4, pp. e1008 -e1015 (doi: 10.1542/peds.2008-0079). Retrieved from http://pediatrics.aappublications.org /content/121/4/e1008. full date18/3/15

३. Dockett, Sue; Perry, Bob ( Mar 2009 ) Readiness for School: A Relational Construct. *Australasian Journal of Early Childhood*, v34 n1 p20-26 .Retrieved from http://eric.ed.gov/?q=Readiness+of+school+for+ educational++problem&pg=2&id=EJ854429 .

४. कुलकर्णी अ. (०९/०४/२०११) उमलू द्याकल्यांना : लहान मुलांचे शोषण, माहिती, खबरदारी व कायदा. Retrieved from http://www.manogat.com/node/21762.

5. Gokte P.S. (2008-2009) .Readiness of schools for inclusive Education: A comparison on the basis of school Types. M.Ed. Dissertation : Education department, University of Mumbai.

6. Holliday, Matthew R.; Cimetta, Adriana; Cutshaw, Christina A.; Yaden, David; Marx, Ronald W. (2014) . Protective Factors for School Readiness among Children in Poverty. Journal of Education for Students Placed at Risk, v19 n3-4 p125-147 . Retrieved from http://eric.ed.gov/?q=EJ1047633&id=EJ1047633

७. केळकर, ग. (१ एप्रिल २०१२). मुलांच्या वर्तन – विषयक समस्या आणि न्यूरो– थेरेपी (पहिली आवृत्ती), लोणावळा : मनशांती न्यू वे आश्रम प्रकाशक . पृष्ठ क्र. ३

८. केळकर, ग. (१ एप्रिल २०१२). मुलांच्या वर्तन – विषयक समस्या आणि न्यूरो– थेरेपी (पहिली आवृत्ती), लोणावळा : मनशांती न्यू वे आश्रम प्रकाशक . पृष्ठ क्र. ३

९. पटेल न. (२०१३) आपल्या मुलांच्या समस्या आणि उपाय (पहिली आवृत्ती), औरंगाबाद : सांकेत प्रकाशन. पृष्ठ क्र.१६

१०. गायकवाड अ. (१७/०१/२०१३) विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र– काही समस्या लोकसत्ता from http://inmyschool.in/bloganswer.php?guid=4f157acd19736

११. Farran, Dale C. (2011). studied on Rethinking School Readiness. Exceptionality Education International, v21 n2 p5-15. Retrieved from http://eric.ed.gov/?q= Readiness+of+school+for+educational++ problem&pg=4&id=EJ949529 on 06/03/2015.

12. H.S.Adelman and L. taylor (1993). Learning problems and learning disabilities. Pacific Grove. Brooks/Cole

13. http:// www.azadindia.org/social-issues/index.html

14. Pamela, C. (2008). School Readiness. PEDIATRICS Vol. 121 No. 4, pp. e1008 -e1015 (doi: 10.1542/peds.2008-0079) Retrieved from http://pediatrics.aappublications.org/content/121/4/e1008.full date18/3/15

15. Prasad, S. and Srivastava, A. N. ( 1998)Learning Disabled Children : Diagnosies And remedial measures. Gupta, N. (1993– 2000) "Guidance And counselling" in Sixth survey in Research in education. M.B. Buch (ed.). New York : NCERT. P.238.

16. Lather, A. S. ; Vasudeva, P. Verma, .(1997) . A study of Durg Abuse among students as related to personality variables. Gupta, N. (1993– 2000) "Guidance And counselling" in Sixth survey in Research in education. M.B. Buch (ed.). New York : NCERT. P.239.

17. Naggapa, P. S. and Venkataiah, N. (1995). Study Habits of Secondary school Students of Mysore city. Gupta, N. (1993– 2000) "Guidance And counselling" in Sixth survey in Research in education. M.B. Buch (ed.). New York : NCERT. P.242.

18. Brassard, Marla R.; Fiorvanti, Christina M. (Jan 2015). School-Based Child Abuse Prevention Programs. Psychology in the Schools, v52 n1 p40-60 Retrieved from http://eric.ed.gov/?q=school+readiness+handling++child+abuse&ff1=dtyIn_2015&id=EJ1047728 on 6/3/2015

19. Walburg, Vera; Moncla, Dany; Mialhes, Aurélie. (Feb 2015). Burnout among High-School Students and Cannabis Use, Consumption Frequencies, Abuse and Dependence. Child & Youth Care Forum, v44 n1 p33-42. Retrieved from http://eric.ed.gov/?q=EJ1049721&id=EJ1049721

20. Power-Elliott, Michleen; Harris, Gregory E. ( 2012 ) Guidance Counsellor Strategies for Handling Bullying. British Journal of Guidance & Counselling, v40 n1 p83-98. Retrieved from http://eric.ed.gov/?q=school+readiness+handling++bullying&id=EJ953758 on 06/03/2015

...